जगभर

# बांगलादेशातील निवडणुका

## चन्द्रशेखर पुरंदरे

बांगलादेशात ३० डिसेंबरला लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या. या निवडणुकीत सत्तारूढ अवामी लीगची आघाडी विरुद्ध जातीय ऐक्य आघाडी हे महत्त्वाचे स्पर्धक. अवामी लीगच्या नेत्या शेख हसीना या गेली दहा वर्षे पंतप्रधान आहेत. त्या बांगलादेशाचे संस्थापक शेख मुजिबूर रहमान यांच्या कन्या. ते लष्करी उठावात १५ ऑगस्ट १९७५ला बळी पडले. नंतर १९९१ पर्यंत बांगलादेशात या ना त्या स्वरूपात मुख्यत: लष्करी सत्ता राहिली. हा काळ रक्तरंजित होता. त्या काळातील एका लष्करी राजवटीचा प्रमुख झिया-उर रहमान. [१९८१ला त्यांचा खून झाला.] १९९१ नंतर त्यांची पत्नी बेगम खलिदा झिया व शेख हसीना यांच्याकडे आलटून पालटून सत्ता राहिली.

बेगम झिया भारताला अनुकूल नव्हत्या. त्या कारकीर्दीत कडव्या इस्लामी शक्तींना राजाश्रय मिळाला. भ्रष्टाचारही वाढला. त्या आरोपावरून बेगम झिया मागच्या वर्षापासून तुरुंगात आहेत. [त्यांची बांगलादेश नॅशनल पार्टी ही आताच्या जातीय ऐक्य आघाडीत आहे.]

बेगम हसीना यांच्या कारकीर्दीत दरडोई उत्पन्न या दहा वर्षात दीडपटीने वाढले. दारिद्र्यरेषेखालील आधीचे सुमारे १९ टक्के लोक आज ९ टक्के असावेत. समाज-कल्याण योजना सुधारल्या. सरकारने आतंकवादी इस्लामी शक्तींवर आळा घातला.

याबरोबरच मानवी हक्कांची पायमल्लीही झाली. विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांना खोट्या आरोपांखाली अटक करणे, मारहाण करणे, त्यांच्यावर पोलीस सर्वेक्षण करणे, वगैरे. प्रसारमाध्यमांवर, इंटरनेटवर बंधनेही आली. विरोधी मत व्यक्त केल्यास तुरुंगाची हवा असा कायदा झाला. मादक पदार्थांचा व्यापार करणाऱ्या गुंडांना बहुधा 'संशयित गुंडांना' पोलिसांनी विनाचौकशी ठार मारले [आजवर ४००] अवामी लीगच्या विद्यार्थी शाखेचे वर्तनही गुंडगिरीचे राहिले आहे.

तेव्हापासून या सरकारवर पश्चिमेतून टीका आहे. या संदर्भात एक गोष्ट निर्विवाद - पश्चिमेचा मानवी हक्कांचा गजर बहुधा दांभिक असतो. तिसऱ्या जगावर ही टीका करताना त्यांच्यावर युद्धे लादणे, आर्थिक फायद्यासाठी त्या देशांच्या साधनसंपत्तीची लूट करणे याद्वारे त्यांचे मानवी हक्क नाकारणे राजरोस चालू असते.

ताज्या निवडणुकीत अनेक गैरप्रकार झाले. अनेक ठिकाणी मतदान सुरु होण्यापूर्वीच मतदान पेट्या भरल्या होत्या - त्या अर्थातच अवामी लीगला मते देणाऱ्या मतपत्रिकांनी. काही ठिकाणी हे बोगस मतदान अशा थराला गेले की अनेक विरोधी उमेदवारांना एकही मत मिळाले नाही - त्यांचे स्वत:चेही! विरोधी पक्षाच्या एजंटना मतदान केंद्रावरून हाकलण्यात आले. त्यामुळे मतदान निष्पक्षपाती होत आहे यावर देखरेख राहिली नाही. अवामी लीगचे अनेक एजंट मतदान केंद्रांवर दिसत होते, पण विरोधी पक्षाचा एकही नाही. संभाव्य विरोधी मतदारांना त्यांचा मतदार क्रमांक मिळणे त्यामुळे अशक्य झाले. विरोधी पक्षाला अनुकूल मतदारसंघात मतदान केंद्रे लवकर बंद करण्यात आली, 'जेवणाच्या सुट्टीसाठी'ही बऱ्याच ठिकाणी! तेथे मतपेट्याही कमी होत्या ज्यामुळे मतदारांच्या रांगा वाढत राहिल्या व अनेक मतदार कंटाळून निघून गेले. निवडणुकीआधीपासून व दरम्यान उसळलेल्या सार्वत्रिक हिंसाचारात किमान १७ लोक मरण पावले.

आंतरराष्ट्रीय मतानुसार वस्तुत: बेगम हसीना यांच्या पक्षाला हे दमनकारी उद्योग करण्याचे कारणच नव्हते. विकासाच्या कसोटीवर अवामी लीग सहज निवडून आली असती. पण ती अनिश्चितता नको म्हणून हे गैरप्रकार करण्यात आले. शक्य




त्या सर्व तंत्रांनी विरोध दडपणे हे धोरण झाले. निवडणुकीत अवामी लीगला ३०० पैकी २८८ जागा मिळाल्या. किंवा ९६टक्के मते मिळाली.

अशा अगदी उघडउघड एकतर्फी निकालाने निवडणुकीची विश्वासार्हता रसातळाला जाते. त्याची हसीना यांना पर्वा दिसत नाही. तसेच वर उल्लेख केलेला मानवी हक्कांच्या मुद्यावरचा पश्चिमेचा दांभिकपणा मान्य करूनही अशा आक्षेपात थोडे-बहुत तथ्य असू शकते हे हसीनांना मान्य नाही. 'माझ्या देशाला काय श्रेयस्कर ते मला माहीत आहे. त्यावर तुमच्या सल्ल्याची गरज नाही. तुमच्या स्वयंसेवी संघटना त्यांच्या वर्गणीदारांकडून पैसे मिळवण्यासाठी इथले विपर्यस्त चित्र उभे करतात...' इत्यादि.

या भूमिकेने दोन प्रश्न निर्माण होतात. उदा. वास्तवात आज अमेरिका बांगलादेशात सर्वात अधिक आर्थिक गुंतवणूक असणारा परदेश आहे. त्यामुळे त्याने मानवी हक्कांच्या पायमल्लीचा आरोप केला तर त्याचा बांगलादेशाच्या दृष्टीने व्यापारावर अनिष्ट परिणाम होऊ शकतो. तीच गोष्ट युरोपियन युनियनची. विशेष म्हणजे, पश्चिम मानवी हक्कांबाबत जेवढी आवाजी असते, तेवढे बांगलादेशातील इतर गुंतवणूकदार देश नसतात. उदा. चीन, भारत, दक्षिण कोरिया, वगैरे. निवडणुकीत हसीना विजयी झाल्यानंतर चीन व भारताने तत्परतेने त्यांचे अभिनंदन केले. कारण व्यापारी हितसंबंध व कडव्या इस्लामला तेथील पायबंद. पण अमेरिका आणि युरोपने विरोधकांची मुस्कटदाबी आणि निवडणूक प्रक्रियेतील हिंसाचार याची सरकारने चौकशी करावी अशी मागणी केली.

दुसरा जरा जास्त गुंतागुतीचा प्रश्न तिसऱ्या जगातील विकसनशील देशांच्या संदर्भात. विकास किंवा मानवी हक्क हे द्वंद्व या देशांचे नेतृत्व उभे करते, ते भ्रामक आहे. न्याय्य विकास हे धोरण असले पाहिजे. लोकशाही असूनही SEZ साठी भूमिपुत्रांना विस्थापित करणे हा न्याय्य विकास म्हणता येत नाही. पण हसीनांच्या विकासवादी नेतृत्वाचे म्हणणे असे की 'लोकांना अन्न , नोकऱ्या आणि आरोग्यसेवा जर माझे सरकार देत आहे, तर ते त्यांचे मानवी हक्कच संभाळत आहे.' पर्यायाने या सरकारला विरोध करणे हा गुन्हा ठरतो. ही भूमिका लोकशाही नाकारते.

शेख हसीनांचा वैयक्तिक कल पहाता त्यांची वाटचाल एकाधिकारशाहीकडे चाललेली आहे असे दिसते. अशा नेतृत्वाला आपण सत्ताच्युत होऊ अशी कायमच भीती असते आणि जो कोणी विरोध करेल, त्याचे दमन योग्य वाटते. उदा. मागच्या ऑगस्टमध्ये ढाका या राजधानीत दोन शाळकरी मुले वाहनाखाली चेंगरून दगावली. रस्त्यावरील वाहतुकीच्या या गंभीर परिस्थितीविरुद्ध प्रचंड उत्स्फूर्त निदर्शने झाली. निदर्शक बहुसंख्येने विद्यार्थी होते, त्यांच्यावर पोलिसांनी अवाजवी हिंसक कारवाई केली, अवामी लीग विद्यार्थी संघटनेनेही हिंसा केली. त्यात अनेक मुले जखमी झाली. सरकारने इंटरनेट बंद केले ज्यायोगे मुले सोशल मिडीयावरून एकत्र येऊ नयेत. घटनांचे चित्रीकरण करणाऱ्या प्रत्यक्षदर्शी वार्ताहरांना धमक्या, मारहाण, अटका यांना सामोरे जावे लागले. त्यांचे कॅमेरे फोडण्यात आले, इत्यादी. हे निषेध लोकशाहीविरुद्ध व विशेषत: आपल्या पक्षाविरुद्ध आहेत हा अवामी लीगचा ग्रह चूक होता.

अशा वृत्तीला व नेतृत्वाला भारत व चीन या शेजारच्या महासत्तांचा पाठिंबा आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या अनैतिकतेचे हे आणखी एक उदाहरण.

www.art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk